# राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० : एक आढावा

**डॉ. वैजयंती पेशवे**
कमला नेहरू महाविद्यालय,
नागपूर

---

मानवाच्या संपूर्ण क्षमतांचा विकास होण्यासाठी शिक्षण हे महत्त्वाचे साधन आहे. देशाची प्रगती, आर्थिक विकास, सामाजिक न्याय आणि समानता शास्त्रीय प्रगती, राष्ट्रीय एकात्मता आणि संस्कृतीचे जतन या सर्व क्षेत्रामध्ये वैश्विक पातळीवर स्थान प्राप्त करण्यासाठी दर्जेदार शिक्षण उपलब्ध होणे फार महत्वाचे आहे. कारण दर्जेदार शिक्षणाने व्यक्ती, समाज, देश आणि त्याचबरोबर जगाचेही हित साधल्या जाते.

भारताला शिक्षणाची फार प्राचीन परंपरा प्राप्त झाली आहे. भारतीय संस्कृती आणि तत्वज्ञानाचा जगावर फार मोठा प्रभाव पडलेला आजही दिसून येतो. प्राचीन भारतात शिक्षणाचे लक्ष्य केवळ ज्ञान मिळविणे एवढेच नव्हे तर पूर्ण आत्मज्ञान किंवा मोक्षाशी निगडीत असलेले आपल्याला दिसून येते. प्राचीन काळात ज्ञान मिळविण्यासाठी गुरूच्या आश्रमात विशिष्ट काळ घालवावालागत असे, गुरूकुल पद्धती अस्तित्वात होती. विद्यार्थ्यांचा कल पाहून गुरू त्याला त्या प्रकारचे शिक्षण देत असे. गुरूच्या आश्रमात केवळ बौद्धिक विकासाचा विचार न करता मन, बुद्धी, शरीर या तिन्ही क्षमतांचा विकास करण्याची जवाबदारी गुरूला पार पाडावी लागत असे व त्यासाठी विद्यार्थ्याला कठोर परिश्रम करावे लागत असे. कालांतराने ही पद्धत बदलत गेली. शाळा व महाविद्यालये निर्माण झाली तिथे विद्यार्थी व गुरू एकत्र जमून ज्ञानदानाचे कार्य सुरू झाले. महात्मा ज्योतिबा फुले, शाहू महाराज, आगरकर यांनी त्यांच्या काळात शिक्षण पद्धतीत बदल घडवून आणले. त्यांच्यामुळे महिला आणि दलितांसाठी शिक्षणाची दारे उघडली गेली. म. गांधीनी ‘नई तालीम’ या शिक्षण पद्धतीने अनुभव आणि शिक्षण यांची सांगड घालून शिक्षणाला नवा आयाम दिला. मात्र मेकॉलेच्या शिक्षण पद्धतीने या पूर्ण प्रक्रियेत परिवर्तन झाले.

भारत स्वतंत्र झाल्यानंतर शिक्षण पद्धतीत वारंवार अनेक परिवर्तन घडून आले. १९६४ ला पहिले एज्युकेशन कमिशन निर्माण करण्यात आले. त्यात १९८६ पर्यंत ५ ते ६ या वयोगटातील सर्व मुले शिक्षण प्रक्रियेत समाविष्ट होतील असे ध्येय ठेवण्यात आले. १९८६ साली भारताची पहिली एज्युकेशन पॉलिसी जाहीर करण्यात आली, यात अंगणवाडी व प्राथमिक शिक्षणाबरोबर कार्यरत महिलांच्या शिक्षणावर भर देण्यात आला. यातच थोडा बदल करून १९९२ च्या नॅशनल एज्युकेशन पॉलिसिद्वारे २००६ पर्यंत सात लाख अंगणवाडी उघडण्याचे ठरविण्यात आले. याच्या अंमलबजावणीसाठी एक कार्यसमिती तयार करण्यात आली. याद्वारे २००० साली नॅशनल करिकुलम फ्रेमवर्क निर्माण करण्यात आले व सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत २००७ सालापर्यंत सर्व लहान मुले शिक्षण घेतील अशी निती तयार करण्यात आली व त्यामुळे शिक्षण प्रणालीतील बदलाला सुरूवात झाली. २००९ साली ‘राईट टू एज्युकेशन’ हा नियम अमलात आणण्यात आला. त्यानंतर सर्व शिक्षण पद्धतीतील स्थितीचा अभ्यास करून २०२० मध्ये नवीन शिक्षण पद्धती जाहीर करण्यात आली. यात शिक्षणाच्या मुळ गाभ्यात परिवर्तन करून विद्यार्थ्याला ज्ञानदृष्टी आणि सत्य या भारतीय विचार परंपरेवर फोकस ठेवून शिक्षण पद्धती तयार करण्यात आली. नव्या होणाऱ्या औद्योगिक बदलानुसार जीवनशैलीतही बदल होत जातो यास्तव शिक्षण पद्धतीतही बदल करणेही काळाची गरज ठरते.

आजच्या काळात केवळ शिकणेच महत्त्वाचे नाही तर शिक्षण अधिक अनुभवात्मक, सर्वसमावेशक, एकात्मिक, जिज्ञासू, संशोधनकेंद्री, लवचिक, आनंददायक होणे महत्वाचे आहे. विद्यार्थ्यांच्या सर्व पैलु आणि क्षमतांचा समाधानकारक विकास होण्यासाठी अभ्यासक्रमात विज्ञान आणि गणिताच्या बरोबरीने मूलभूत कला, हस्तकला, मानव्यशास्त्रे, क्रीडा, स्वास्थ, भाषा, साहित्य, संस्कृती आणि मूल्ये यांचा समावेश असणे आवश्यक आहे. शिक्षणामुळे चारित्र्य घडणे गरजेचे आहे.

२९ जुलै २०२० रोजी राष्ट्रीय शिक्षण धोरण (National Education Policy) अस्तित्वात आले. शिक्षण हा समाजाचा अत्यंत जिव्हाळयाचा व सर्व घटकांशी संबंधित विषय असल्यामुळे हे धोरण आखतांना 'सर्वांगिण परीवर्तन' डोळयासमोर ठेवलेले दिसून येते. शिक्षणाचा विकास आणि विस्तार करतांना जागतिक शिक्षण क्षेत्राच्या दृष्टीनेही याचा विचार केला आहे. स्वातंत्र्यानंतरही भारतीय समाजाचा फार मोठा हिस्सा शिक्षणाच्या कक्षेत येवू शकला नाही. त्यांना यात समाविष्ट कसे करता येईल या प्रक्रियेचा विचार यात करण्यात आला आहे. प्राथमिक शिक्षणापासून तर विश्वविद्यालयीन शिक्षणापर्यंतचा विचार यात केला आहे. भारतीय मुल्यव्यवस्थेला यात केंद्रस्थानी मानले आहे. ज्ञानधारित समाज निर्माण करण्याचा निर्धार या धोरणात व्यक्त करण्यात आला आहे. समानता, सुलभता, गुणवत्ता आर्थिक समता या तत्वाशी यात बांधिलकी व्यक्त करण्यात आली आहे. त्याबरोबरच संविधानातील अधिकार आणि कर्तव्याची पूर्तता याचे भानही ठेवण्यात आले आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरणाने अनेक संरचनात्मक बदल घडवून आणले. शालेय शिक्षणाच्या संरचनेत १०,२,३ अश्या आकृतीबंधाच्या ऐवजी ५,३,३,४ असा बदल स्वीकारण्यात आला. ही केवळ आकडयांची अदलाबदल नाही तर पूर्व प्राथमिक आणि प्राथमिक शिक्षणाचा पाया मजबूत करणारा हा बदल आहे. कुतुहल, जागृती, नाविन्याचा ध्यास, बृद्धीमत्तेचा जलद विकास या मुद्‌यांवर भर देण्यात आला आहे. यात वयाच्या ३ वर्षापासून शिक्षणाचा विचार केला आहे. वयानुसार ३ ते १८ असा आराखडा तयार करण्यात आला आहे. पहिली तीन वर्ष विकास आणि उपयोगितेचा विचार करणारी आहे. यात कृती शिक्षणाचाही समावेश आहे. उच्च शिक्षणाला सुरूवात करण्यापूर्वी ३ ते १८ वर्ष हा प्रागतिक वृत्ती विकासाचा कालखंड मानला गेला. होणारा विकास हा भरभक्कम पायावर उभा रहावा असा विचार या धोरणात केला गेला ३ ते १८ या वयोगटाला सक्तीचे व मोफत शिक्षण ही या धोरणाची मुळ कल्पना होती. समाजजीवन समृद्ध करणे हा शिक्षणाचा मुख्य उद्देश मानला गेला. तसेच या धोरणात गळतीच्या समस्येचाही विचार करण्यात आला आहे. सामाजिक समरसतेच्या उद्दिष्टांची पूर्तता शिक्षणाशिवाय होवू शकत नाही. त्यासाठी अनेक अविकसित क्षेत्रांना शैक्षणिकदृष्टया विकसीत करण्याची भूमिका या धोरणात विचारार्थ घेतली आहे व त्यासाठी पर्याप्त निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन मिळावे यासाठी एक सर्वसमावेशक निधी व्यवस्था करण्यात आली आहे.

या धोरणात परस्पर सहकार्याचा एक प्रस्ताव मांडण्यात आला आहे. यासाठी 'विद्यालय संकुलाची' कल्पना मांडण्यात आली आहे. याची संकल्पना अशी आहे, समाजात आपल्याला शिक्षणक्षेत्राच्या दोन अवस्था दिसतात. एकीकडे इमारत, प्रयोगशाळा, संगणक, शिक्षण, प्रशिक्षण इ. सुविधांनी युक्त अशा शाळा आहेत (विशेषत: शहरी भागात) तर दुसरीकडे या सगळयांचा अभाव असणाऱ्याही शाळा आहेत (ग्रामीण भागात), 'विद्यालय संकुलाच्या कल्पनेने या दोघांचेही परस्पर सहकार्य साधुन समस्यांचे निराकरण करण्याचा

प्रयत्न करण्यात आला आहे. विद्यार्थी केंद्रीत या धोरणामुळे होणारे परिवर्तन विकासाकडे नेणारे आहे यात शंका नाही.

या धोरणात उच्च शिक्षणातही फार मोठया प्रमाणात बदल घडवून आणण्याच्या अनुषंगाने काही निर्णय घेण्यात आले आहेत. उच्च शिक्षणाचा विस्तार फार मोठा आहे. आठशेपेक्षा अधिक विद्यापीठे, पंचेचाळीस हजारापेक्षा अधिक महाविद्यालये, चार कोटी विद्यार्थ्यांची संख्या असा याचा आवाका आहे, असे असले तरी, उच्च शिक्षण घेणाऱ्यांची टक्केवारी २६ ते २७ % एवढीच आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरणाने हे प्रमाण ५०% पर्यंत पोहोचविण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.उच्च शिक्षणावर आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मक वातावरणाचा फार मोठा परिणाम झालेला दिसून येतो व नव्या औद्योगिक क्रांतीच्या पर्वाला सुरूवात झाल्याने शिक्षणावर त्याचा परिणाम होणे स्वाभाविकच आहे. शिक्षण आणि उद्योग यांच्यातील संवाद आणि सहकार्य असणे ही काळाची गरज आहे. अर्थ आणि उद्योगाशी संबंध असल्यामुळे उच्च शिक्षणाचे आयाम बदलेले आहेत. व्यक्तिमत्व विकासाबरोबर रोजगारक्षम शिक्षण निर्माण करण्याकडे या धोरणाचा कल दिसतो. सध्याच्या परिस्थितीत आपल्या देशातील मोठे बौद्धीक बल विदेशात स्थाईक होतांना दिसते आहे हे थांबविण्यासाठी आपल्या देशातील अनुसंधान आणि नवाचाराचे क्षेत्र विकसीत करण्याचा विचार करण्यात येत आहे. उच्च शिक्षणात काही महत्वाचे बदल करण्यासाठी बहुशाखीय शिक्षण, लवचिकता आणि स्वायत्तता या तीन आयामांना प्राधान्य देण्यात आले आहे. रोजगारक्षम, व्यावसायिक आणि संशोधनात्मक शिक्षणाचे प्रमाण वाढविण्यासाठी मोठया प्रमाणात प्रयत्न करण्याची गरज आहे. त्यासाठी गेल्या पन्नास वर्षातील पारंपारिक उच्च शिक्षणाची वाट बदलण्यात आली आहे. विश्वविद्यालयाचे तीन गट तयार करण्यात आले १) संशोधनकेंद्रीत विद्यापीठ २) शिक्षणकेंद्रीत विद्यापीठ ३) गुणवत्ता, मुल्यांकन यावर आधारित विद्यापीठ.

या धोरणातबहुशाखीय शिक्षणाचे तत्व स्वीकारण्यात आले आहे. त्यामुळे उच्च शिक्षणाचे स्वरूप पूर्णपणे बदलणार आहे. बहुशाखीय शिक्षण देणाऱ्या विद्यापीठांची निर्मिती करण्यात येईल या विद्यापीठांची रचना प्ळ ६ ज्ळ या स्तरावरची असेल.लवचिकतेच्या तत्वानुसार कोणत्याही विषयाची निवड करण्याची सुविधा विद्यार्थ्यांना लाभणार आहे. काही कारणास्तव शिक्षण प्रक्रियेतुन मधुनच बाहेर पडावे लागले तर एका वर्षानंतर प्रमाणपत्र, दोन वर्षानंतर डिप्लोमा मिळेल व कालांतराने इच्छा असल्यास पुन्हा याच शिक्षण उपक्रमात सहभागी होता येईल. अश्या प्रकारचा विचार पहिल्यांदाच आपल्या देशात केला जात आहे.होणारे हे परिवर्तन गुणविकासासाठी उपयुक्त ठरणारे आहे. १४ विद्या ६४ कला जिथे शिकण्यासाठी उपलब्ध असतील, लोकविद्यांचा ज्यात समावेश असेल अशी सर्वसमावेशक विश्वविद्यालये निर्माण करण्याचा उद्देश या धोरणात नोंदविला आहे. विश्वविद्यालये ही संशोधनाची महत्वपूर्ण केंद्रे असतील. विश्वविद्यालयाच्या व विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून 'National Research Foundation' या संस्थेची निर्मिती करण्यात येणार आहे.निधीची पूर्तता, संशोधनास मान्यता, संशोधनाला प्रोत्साहन, इतर सर्व सुविधांची निर्मिती या सर्व घटकांचा विचार व त्याची अमंलबजावणी करण्याची पूर्ण जवाबदारी या थ्वनदकंजपवदची राहील.

असे हे राष्ट्रीय शिक्षण धोरण खूप व्यापक आहे. शिक्षणाच्या सामाजिक उत्तरदायित्वाचे ध्येय पूर्ण करण्यासाठी सहायक आहे. सामाजिक विषमता संपविण्यासाठी याचा फार मोठया प्रमाणात हातभार लागणार आहे. गळती, शिक्षणाचे बाजारीकरण, ग्रामीण भागात शिक्षणाचा विकास, ऑनलाइन शिक्षणासाठी आवश्यक सुविधांचा अभाव या ज्या काही अडचणी किंवा समस्या शिक्षण क्षेत्रात निर्माण झालेल्या आहेय त्यावर मात करून हे धोरण राबविणे व यशस्वी करणे ही प्रत्येक भारतीयाची जवाबदारी आहे.

समाजाच्या कल्याणाच्या दृष्टीने तसेच एक लोकतांत्रिक, न्याय, सामाजिकदृष्टया जागृत, सुसंस्कृत आणि माणुसकी असलेले राष्ट्र, जिथे स्वातंत्र्य, समानता, बंधुभाव आणि न्यायाचा अधिकार आहे. अश्या देशाच्या विकासासाठी उच्च शिक्षणाची खूप महत्वाची भूमिका असते. एक ज्ञानी सामाजिकदृष्टया जागृत, विद्वान आणि कुशल राष्ट्र निर्माण करण्याची क्षमता उच्च शिक्षणामध्ये आहे. दर्जेदार उच्च शिक्षणाचे उद्दिष्ट फक्त वैयक्तिक रोजगाराच्या चांगल्या संधी निर्माण करणे एवढे मर्यादित / संकुचित नसुन चैतन्यपूर्ण, सामाजिकदृष्टया आनंदी व सामंजस्यपूर्ण, सुसंस्कृत, उत्पादनशील, नाविन्यपूर्ण, पुरोगामी आणि समुद्ध देश तयार करण्याची उच्च शिक्षण ही गुरूकिल्ली आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० यात या सर्व क्षमतांचा विचार करण्यात आल्याचे आपल्याला दिसुन येते. शिक्षण हे केवळ उपजिविकेचे साधन नसुन देशाला प्रगतीपथावर नेणारा एक परिपूर्ण नागरिक घडविणारे बहुमुल्य व महत्वाचे साधन आहे. या धोरणाचा यशस्वीरित्या अवलंब झाल्यास भारताचे महासत्ता बनण्याचे स्वप्न लवकरच वास्तवात येईल असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

**संदर्भ :**


- राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० – शिक्षण मंत्रालय भारत सरकार
- विवेक मासिक : ६ सप्टेंबर २०२०, लेख : शिक्षण, प्रा. अनिरूद्ध देशपांडे, पृष्ठ क्र. २२१.२२७